पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक ०९/०१/२०२०*

## हैद्राबाद येथे कत्तलीकरिता घेवुन जात असलेल्या जनावरांची सुटका

- ***एकुण ७६ लाख ४९ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, गडचिरोली पोलीस दलाची धडक कार्यवाही.***

*कोरची परिसरातुन मोठया प्रमाणात हैद्राबाद येथे जनावरांची वाहातूक करण्यात येणार असल्याबद्दल गोपनिय माहीती मिळाल्यानंतर मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी , पोउपनि भागवत कदम, पोहवा भाऊराव बोरकर, पोहवा नरेश सहारे, पोहवा सत्येम लोहंबरे, नापोशि मंगेश राऊत, चालक मानिक निसार, आरमोरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक दिगंबर सुर्यवंशी व इतर कर्मचारी यांनी पोलीस स्टेशन आरमोरी हद्दीतील वैरागड टी-पॉईंट येथे सापळा रचुन कत्तलीकरिता जनावरे घेवुन जात असलेले तीन कंटेनर टिएस-१२ युबि-७६२०, टिएस-१२ युबि-६७२१, टिएस-०७ युएफ-३१८२ ताब्यात घेतले. या कंटेनरची पाहणी केली असता कंटेनर मध्ये ९१ जनावरे आढळुन आली. या मध्ये ४ जनावरे मृतावस्थेत आढळुन आली. गडचिरोली पोलीसांनी जनावरे व कंटेनर असा एकुण ७६ लाख ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असुन आरोपी नामे शाहरुख गफ्फार खान रा. आर्णि, मोहम्मद शकील समशेर रा. हैद्राबाद, अल्ताफ अक्बर शेख रा. गडचांदुर, इब्राहिम खान हमीद खान रा. हैद्राबाद यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द आरमोरी पोस्टे येथे अप क्रं. १०/२०२० प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतिबंध अधिनियम कलम ११ (१)(ड), तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५ (१) (अ), ९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.*

*गडचिरोली पोलीस दल घटनेचा पुढील तपास करत आहेत.*

*या उत्कृष्ट कामगीरी करण्याऱ्या पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांचे मा. पोलीस अधीक्षक सा़ो. कौतुक केले आहे.*


GOODS CARRIER
GOODS CARRIER